# निसर्गनिर्मित तणाव

श्रीमद् नामचैतन्य भानुदास
दि. १४–१०–२००८
दैनिक सकाळ, मुंबई यांच्या सौजन्याने

नैसर्गिक आपत्तीतही खंबीरपणे उभे राहिलेल्या अध्यात्म–विज्ञानाच्या साधकांचे काही अनुभव– २६ जुलै२००५च्या मुसळधार पावसामुळे मुंबईत पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. अध्यात्म–विज्ञानाचे साधक  सोमाजी दळवी हे इन्कमटॅक्स ऑफिसर होते. ते घाटकोपरला काही कामासाठी गेले होते.  २२–२३ वर्षाची दळवींची धाकटी मुलगी क्षमा, ऑफिसमधून रात्री नऊच्या सुमारास पाण्यातून कशीबशी घरी पोचली तेव्हा तिची आई घरी नव्हती. तेवढ्यात घाटकोपरच्या एका हॉस्पिटलमधून फोन आला. ''यह दळवीका घर है क्या?'' क्षमाने ''हो'' म्हटल्यावर तिकडून भराभरा शब्द कानावर पडले, ''एस.ए.दळवी एक्सपायर हो गये। चार लोगोंने उनको इस हॉस्पिटलमें लाया।  आप किसीको हॉस्पिटलमें भेजो!'' वडील निवर्तल्याची बातमी कळल्यावर ती क्षणभर हबकली. तिने तिच्या काकांना फोन लावला.  त्यांनी तिला सांगितलं ''आई आणि काकू हॉस्पिटलकडे गेल्या आहेत. तू आमच्या घरी निघून ये.''  काकांच्या घरी आल्यावर रात्री दहाच्या सुमारास मनाच्या त्या अवस्थेतही तिने काकांना विचारलं, ''काही खायला करू का?'' ते म्हणाले ''नको.'' स्वत:च्या पोटात अन्नाचा कण नसताना  ती पहाटे पाच पर्यंत  पावसामुळे घरात शिरलेलं पाणी काढत होती.  पहाटे घरी परत येताच हॉस्पिटलमधून पुन्हा फोन आला ''अभी तक आपके घर से कोई आया नही है। मैं डेथ सर्टिफिकेट नही दूंगा!'' फॅमिली डॉक्टरसह ती हॉस्पिटलमध्ये गेली. डेथ सर्टिफिकेट घेऊन परत येत असताना शेजारच्या बाई पाण्यातून चालताना तिला दिसल्या. त्यांना क्षमाने गाडीत घेतलं. वडिलांचं पार्थिव घरी आल्यावर आईचं सांत्वनही तिलाच करावं लागलं. आईसुद्धा तासाभरातच सावरली. दळवी कुटुंबानं हा आघात पचवला. त्याच दिवशी तळमजल्यावर राहाणाऱ्या अध्यात्म–विज्ञानाच्या अनेक साधकांचीही   घरं पाण्यात बुडाली होती. त्यांचं प्रचंड नुकसान झालं होतं. त्याही परिस्थितीला त्या साधकांनी धैर्याने तोंड दिलं. सर्वांनाच अध्यात्म–विज्ञानाच्या त्रिसूत्रीने हात दिला होता. परिस्थितीचा स्वीकार करा. नंतर त्या परिस्थितीशी जुळवून घ्या आणि मग त्या परिस्थितीवर मात करा. सर सलामत तो पगडी पचास.